दिनांक - 18/12/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.200

विषय – स्वच्छ सर्वेक्षण 2023-24 अंतर्गत विटा नगरपरिषेतील कर्मचारी विटा ते इंदौर अभ्यास दौरा करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 12/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

स्वच्छ सर्वेक्षण 2023-24 अंतर्गत विटा नगरपरिषेतील कर्मचारी विटा ते इंदौर अभ्यास दौरा करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) शैलेश टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स, पुणे | प्रति व्यक्ती दर र.रू.14,500/- |
| 2) एम्पायर हॉलिडेज, पुणे | प्रति व्यक्ती दर र.रू.13,900/- |
| 3) स्वराज हॉलिडेज, विटा | प्रति व्यक्ती दर र.रू.10,300/- |

उपरोक्त निविदापैकी स्वराज हॉलिडेज, विटा यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 18/12/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.201

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील 6 सार्वजनिक शौचालयांमध्ये महिलांना सोयीसुविधा पुरविणेकामी प्रायोगिक तत्वावर सॅनिटरी नॅपकीन वेंडिंग मशीन व इनसिनरेटर बसविणे आणि सदरच्या मशीनींची देखभाल महिला बचत गटामार्फत करणेकामी वार्षिक करार पद्धतीने महिला बचत गटाची नियुक्ती करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य विभाग प्रमुख यांची दिनांक 13/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

2) मा. उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांचे कडील पत्र क्र. DAY-NULM/SM&ID/AAP/D10/2023-24/6076,दिनांक 07 नोव्हेंबर 2023

स्वच्छ भारत अभियान 2.0 च्या मार्गदर्शक तत्वांनुसार DAY- NULM व स्वच्छ भारत अभियान यांच्यातील कृतीसंगम उपेक्षित गटांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारेल आणि संपूर्ण भारतातील शहरी भागात गरिबी आणि स्वच्छतेच्या आव्हानांना तोंड देईल. यासाठी संपूर्ण स्वच्छता मुल्य साखळी सुधारणे आणि स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रासाठी एक संस्थात्मक फ्रेमवर्क तयार करणे आवश्यक आहे. MoHUA द्वारे स्वच्छता (Sanitation) व घनकचरा व्यवस्थापन (Solid Waste Management) अंतर्गत स्वयंसहाय्यता बचतगट स्थापनेच्या अनुषंगाने खालील सूचना देण्यात येत आहेत.

- नव्याने स्वच्छता क्षेत्रातील व घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रातील गटांची स्थापना करण्यात यावी, गटांना फिरता निधी उपलब्ध करून द्यावा.
- गटांना सामुदायिक शौचालये आणि सार्वजनिक शौचालयांचे संचालन आणि देखभाल (O&M) यांची कामे देण्यात यावीत.
- गटांच्या माध्यमातून वेस्ट टू वेल्थ प्रकल्प हाती घेणे आणि RRR चालविणे. (रिड्यूस, रीयूज आणि रिसायकल)
- गटांद्वारे घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे व त्यावर प्रक्रिया करणे अशी कामे करुन घ्यावीत.
- शहरातील मायक्रो कम्पोस्टिंग सेंटर (MCC) आणि मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (MRF) चे व्यवस्थापन गटांना देण्यात यावे.

आरोग्य विभागाकडून सॅनिटरी नॅपकीन वेंडिंग मशीन आणि इनसिनरेटर 6 शौचालयांमध्ये बसविण्यात आलेले आहेत. सदरच्या शौचालयांमध्ये मुली आणि महिलांचा वापर जास्त आहे, तसेच ही शौचालये चांगल्या प्रकारे व्यवस्थापित केले जातात. सदरच्या मशीनरीजची तोडफोड व चोरी होण्यापासून वाचविणेकरिता शौचालयांमध्ये सॅनिटरी नॅपकीन वेंडिंग मशीन आणि इनसिनरेटर भोवती लोखंडी जाळी लावून त्याला लॉक लावने आवश्यक आहे.

पान नं.2 वर

सदरच्या मशीनरीजची देखभाल करणेकामी, वेळोवेळी वेंडिंग मशीनमध्ये सॅनिटरी नॅपकीन्स रिफील करणे तसेच वापरलेल्या नॅपकीन्सची राख इनसिनरेटर मधून काढून घंटागाडी मध्ये टाकणे याकामी बचत गटाची वार्षिक करारपद्धतीने नियुक्ती करून या स्वच्छतेच्या कामामध्ये बचत गटाचा समावेश करून घेता येईल. अशाप्रकारे बचत गटाला उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देता येईल.

सदरच्या 6 शौचालयांमध्ये लोखंडी जाळी बसविणेकरिता अंदाजे रक्कम रुपये 25,000/- इतका खर्च अपेक्षित आहे, तसेच बचत गटामार्फत मशीनरीजची देखभाल करणेकमी प्रति महिना अंदाजे रक्कम रुपये 10,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. नगरपरिषदेच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये 5% महिला व बालकल्याण निधीची तरतूद आहे. सदरच्या कामाची बिले महिला व बालकल्याण निधी मधून अदा करणेत यावीत.

शौचालयांची यादी:

| अ.क्र. | वॉर्ड नं. | शौचालयाचे नाव | महिला शौचकूपांची संख्या | महिला फुटफॉल अंदाजे |
|---|---|---|---|---|
| 1. | 7 | भाजी मंडई सार्वजनिक शौचालय | 4 | 100-150 |
| 2. | 7 | गोकूळ मेस शेजारील सार्वजनिक शौचालय | 4 | 60-70 |
| 3. | 6 | नगरपरिषद इमारतीमधील सार्वजनिक शौचालय | 4 | 100-120 |
| 4. | 6 | बस स्टॅन्ड सार्वजनिक शौचालय | 3 | 300-350 |
| 5. | 5 | मारुती मंदिराशेजारील सार्वजनिक शौचालय | 5 | 50-60 |
| 6. | 11 | रोहीदासनगर येथील सार्वजनिक शौचालय | 5 | 50-60 |

तरी सदरची बाब विचारात घेऊन सदरच्या सॅनिटरी नॅपकीन वेंडिंग मशीन आणि इनसिनरेटर मशीनरीजना लोखंडी जाळी बसविणे आणि सदरच्या मशीनरीजची देखभाल महिला बचत गटामार्फत करणेकामी वार्षिक करार पद्धतीने महिला बचत गटाची नियुक्ती करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 18/12/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.202

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील नगरपरिषद शाळा क्र. 05 चे वॉटरप्रुफींग करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 15/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी
2) मुख्याध्यापक, शाळा क्र. 05 यांचा दि. 10/10/2023 रोजीचा अर्ज.

विटा नगरपरिषद हद्दीतील नगरपरिषद शाळा क्र. 05 चे छत हे मोठया प्रमाणावरती गळती होत असलेने मुख्याध्यापक यांनी दि. 10/10/2023 रोजीचे अर्जान्वये कळविले आहे. सदर शाळेच्या छताचे वॉटरप्रुफींग करणे आवश्यक आहे. या कामाचे अंदाजपत्रक र.रू.3,51,929/- इतके होत आहे. सदरचे काम नगरपरिषद फंडातून करणेत यावे. तरी नगरपरिषद शाळा क्र. 05 चे वॉटरप्रुफींग करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा